# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३६५८**

**अपिलार्थी श्री. मोरेश्वर भनारकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (श्रेणी-२)**
अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, जी-एस विभाग, मुंबई,
मल्होत्रा हाऊस, ६वा मजला, जी.पी.ओ समोर, फोर्ट, मुंबई- ४००००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक**
उपनिबंधक, सहकारी संस्था, जी-एस विभाग, मुंबई,
मल्होत्रा हाऊस, ६वा मजला, जी.पी.ओ समोर, फोर्ट, मुंबई- ४००००१

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०७.२०२३ | ११.०८.२०२३/२८.०८.२०२३ | ०७.०८.२०२४ | २६.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.१२.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ११.०८.२०२३, २८.०८.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २६.०९.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ३१.०७.२०२३ रोजी सहाय्यक आयुक्त, (गृहनिर्माण) सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे यांच्याकडे सादर केलेल्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-
*(१) वरळी सागर स्नेहवर्धिनी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियाजित) मुंबई ही गृहनिर्माण संस्था कोणत्या नावाने नोंदणी झालेली आहे, त्याचा ऑफिस पत्ता काय आहे, मुख्यप्रवर्तक आणि सर्व सदस्य यांची मला संपुर्ण यादी देण्यात यावी.*
*(२) ही संस्था कोणत्या निबंधक, ऑफीस मुंबई मध्ये नोंदणी झालेली आहे, त्याचा नोंदणी क्रमांक व दिनांक यांची प्रतिलिपी देण्यात यावी, उपविधी-प्रत देण्यात यावी.*

३. जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त, (गृहनिर्माण) सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे यांनी अपिलार्थीचा माहिती अर्ज दि. ११.०८.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी, अधिन, उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एस विभाग, फोर्ट, मुंबई यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३)(२) नुसार हस्तांतरीत करुन अपिलार्थीना कळविले.

..२/-

४. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी- २, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एस विभाग, मुंबई यांनी अपिलार्थींना कळविले की, आपल्या माहिती अर्जात नमुद केलेली वरळी सागर स्नेहवर्धिनी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित,) मुंबई ही संस्था या कार्यालयाच्या अभिलेख कक्षेत नसल्यामुळे माहिती देता येत नाही.

५. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०९.२०२४ रोजी अपिलार्थी यांना माहिती अधिकार अर्ज दि.१८.०८.२०२३ चे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०८.२०२३ रोजी दिले असून ते अपिलार्थी यांना मिळाले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांना उत्तर समाधानकारक न वाटल्यास त्यांनी दि. २८.०८.२०२३ नंतर 30 दिवसांत अपिल दाखल करणे आवश्यक होते. मात्र अपिलार्थी यांनी अपिल दि. १२.०८.२०२४ रोजी दाखल केले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे अपिल विहीत मुदतीत नाही असे नमुद करुन अपील अमान्य केलेले आहे.

६. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी.माध्यमाव्दारे), जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थींनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०३.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थी नमुद करत असलेली संस्था नियोजित वरळी सागर स्नेहवर्धिनी सहकारी गृहनिर्माण संस्था ही संस्था नोंदणीकृत या कार्यालयात नसल्याने अपिलार्थी हे मागणी करत असलेली माहिती त्यांना देता येत नाही.

७. अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या निवेदनाची प्रतची मागणी केली.

८. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेला अहवालची प्रत दि. ०४.०३.२०२६ अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसांत नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

6-3-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०६.०३.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai